पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - १८

अ प्रभाग समिती

सभावृत्तांत [कार्यपत्रिका क्रमांक 10]

दिनांक : 07/02/2020 वेळ : सकाळी 11.30 वा.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे फेब्रुवारी **2020 ची** मासिक सभा शुक्रवार दिनांक 07/02/2020 रोजी सकाळी **11.30 वा.** अ क्षेत्रीय कार्यालयातील " **राजमाता जिजाऊ सभागृह**" येथे आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य/सदस्या उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | मा.शर्मिला राजू बाबर | सभापती |
| 2. | मा. अनुराधा गणपत गोरखे | सदस्या |
| 3. | मा.तुषार रघुनाथ हिंगे | सदस्य |
| 4. | मा.मिनल विशाल यादव | सदस्या |
| 5. | मा.वैशाली जालिंदर काळभोर | सदस्या |
| 6. | मा.शैलजा अविनाश मोरे | सदस्या |
| 7. | मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे | सदस्य |
| 8. | मा.राजेश पोपट सावंत | स्वीकृत सदस्य |
| 9. | मा. कांबळे राजेंद्र नामदेव | स्वीकृत सदस्य |

याशिवाय मा.श्रीमती आशादेवी दुरगुडे- क्षेत्रिय अधिकारी, मा.श्री. रविंद्र पवार-कार्यकारी अभियंता(स्थापत्य), मा.श्री. संजय खाबडे-कार्यकारी अभियंता (विद्युत), मा.श्री दशरथ कांबळे-प्रशासन अधिकारी, मा.श्री मोहन निकम-लेखाधिकारी, मा.श्री शिवाजी चौरे-उपअभियंता(स्थापत्य),मा.श्री सुर्यकांत मोहिते-उपअभियंता(स्थापत्य) मा.सौ. लता बाबर-उपअभियंता (विद्युत), मा.श्री मोहन इश्वरा खोंद्रे-उपअभियंता(झोनिपु स्थापत्य), मा. श्री. एस.पी.काळे-उपअभियंता (ड्रेनेज), मा.श्री डी.एम.कुंभार-उपअभियंता(पाणीपुरवठा) मा.श्री साळवी प्रकाश-उपअभियंता (नगररचना) मा.श्री पी.एम.गायकवाड-उद्यान अधिक्षक, श्री कुंभार प्र.गो.-कनिष्ठ् अभियंता(नगररचना), श्रीमती साळुंके अस्मिता-कनिष्ठ अभियंता(स्थापत्य् उद्यान), श्री इनामदार एस.जी.-मुख्य् आरोग्य् निरिक्षक श्री कांबळे आर.बी.-लिपिक(झोनिपु) इ.पदाधिकारी/अधिकारी/ कर्मचारी बैठकीस उपस्थित होते.

सर्वप्रथम मा. सभापती, शर्मिला राजू बाबर यांनी सर्व उपस्थित पदाधिकारी, सन्मा. नगरसदस्य, अधिकारी यांचे स्वागत करुन सभेची सुरुवात करणेस अनुमती दिली.

यानंतर बैठकीचे कामकाज सुरु करणेत आले.

**कार्यपत्रिका क्रमांक ०९ दिनांक १४/०१/२०२० रोजी स.११.३० वा.झालेल्या अ प्रभाग समिती सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत असलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.**

त्यानंतर प्रस्तुत सभेमध्ये खालील विषय ऐनवेळचे विषय म्हणून दाखल करुन घेण्यात आले.

**विषय क्रमांक १:-** सन्मा.सदस्या शैलजा अविनाश मोरे यांचा दिनांक ७/२/२०२० रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक १५ मधील काही भागामध्ये परिसराच्या नावाचे फलक नसल्यामुळे त्या भागात दिशादर्शक फलक बसवून मिळणेबाबत.

(कृ.मा.प.)

सभेत खालीलप्रमाणे ठराव मंजूर करणेत आले.

ठराव क्रमांक 27 विषय क्रमांक 1
दिनांक 07/02/2020 विभाग : सन्मा.सदस्यांचा प्रस्ताव
सुचक: मा. शैलजा मोरे अनुमोदक : मा. अनुराधा गणपत गोरखे

संदर्भ:- सन्मा. सदस्या शैलजा अविनाश मोरे यांचा दिनांक ७/२/२०२० रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक १५ मधील काही भागामध्ये परिसराच्या नावाचे फलक नसल्यामुळे त्या भागात खालील नावांचे दिशा दर्शक फलक बसवून देणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | आकुर्डी गावठाण- | पंचतारानगर, संभाजीनगर, सुदर्शननगर,गुरुदेवनगर. |
| २. | गंगानगर- | हनुमान मंदिर रोड, विजय कॉलनी, सीमा हौसिंग सोसायटी, व तसेच कै.संतोष किर्लोस्कर चौक हा फलक दुरुस्त करुन देणेत यावा. |
| ३. | गड परिसर- | कृष्णा हौसिंग सोसायटी, जयंती हौसिंग सोसायटी, श्री गजानन हौसिंग सोसायटी, इंडियन कार्ड क्लोदिंग सोसायटी, रस्टन कॉलनी, शरद हौसिंग सोसायटी, स्नेहसदन हौसिंग सोसायटी. |
| ४. | से.नं.२५एल.आय.जी.- | सावरकर सदन मार्ग, दक्षिणमुखी मारुती मंदिर रोड, सिंधुनगर दवाखाना. |

तसेच से.नं.२४,२५,२६,२७,२७अ, व २८ या परिसरामध्ये सोसायटींच्या नावाचे व लेनवाईज प्लॉट नंबर उदा.३०१ ते ३१० असे लेनमध्ये जितके प्लॉट असतील त्या पूर्ण प्लॉट नंबरचे एक फलक बसवून देणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

वरील प्रमाणे सभेचे कामकाज होऊन मा. सभापती- शर्मिला राजू बाबर, अ प्रभाग समिती यांनी सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, पदाधिकारी/अधिकारी यांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

[ शर्मिला राजू बाबर ]
सभापती
अ प्रभाग समिती
निगडी- 44

क्रमांक:- अक्षेका/9/कावि/ 31/1 /2020 दिनांक:- 17 /02/2020

(दशरथ कांबळे)
प्रशासन अधिकारी
तथा सचिव, सभा शाखा
अ प्रभाग समिती, निगडी-44

प्रति,
सर्व संबंधित ------------------------